दैनिक

# विदर्भ कल्याण

यवतमाळ जिल्हा विशेष

शुक्रवार,
२९ सप्टेंबर २०२३

## तेलंगणाच्या धर्तीवर आरक्षण देऊन तात्काळ SIT ची स्थापना करा

**विदर्भ कल्याण / दिग्रस**

तेलंगणा राज्याच्या धर्तीवर बंजारा समाजाला अनुसूचित जातीच्या यादीत समाविष्ट करा. विमुक्त जाती (अ) प्रवर्गातील बोगस घुसखोरी शोधून काढण्यासाठी SIT ची स्थापना करुन दोषी आढळणाऱ्याविरुद्ध कठोर कार्यवाही कार्यवाही ची मागणी करत बंजारा समाजाच्या वतीने करण्यात आली. महाराष्ट्रातील बंजारा समाज हा मूळ आदिवासी समाज आहे. परंतु गुन्हेगारी कायद्यातून मुक्तता करताना या समाजाला विमुक्त या गोंडस नावाखाली अनुसूचित जातीतून वगळण्यात आले. तत्कालीन कागद पत्राच्या आधारे तेलंगणा राज्याने बंजारा समाजाला अनुसूचित जातीच्या यादीत समाविष्ट केले आहे. त्यामुळे त्याचं कागदपत्रांच्या आधारे बंजारा समाजाला अनुसूचित जातीच्या यादीत समाविष्ट करावे. अन्याय दूर करुन भामठा नावाने जी बोगस घुसखोरी विमुक्त जाती प्रवर्गात चालू आहे. ती तात्काळ थांबवून SIT ची स्थापना करा ही मुख्य मागणी घेऊन "पांढरे वादळ"विदर्भात घोंघावनार असल्याचे निवेदन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व बहुजन विकास मंत्री अतुल सावे यांना शेतकरी नेते मनोहर राठोड यांनी दिले. हिवाळी अधिवेशनाच्या आत या मागणीची पूर्ततांना केल्यास आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला सामाजिक कार्यकर्ते डि.डी. नाईक यांनी मंत्रालयात दिला आहे. याबाबत दिलेल्या निवेदनात विमुक्त जाती (अ) या अतिमागास जातीच्या प्रवर्गात मागील अनेक वर्षांपासून सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या अतिप्रगत असलेल्या राजपूत, मीना व यासारख्या अन्य काही जातीची बोगस घुसखोरी सुरू आहे. संवैधानिकदृष्ट्या या जाती आरक्षणास पात्र नाहीत.त्यामुळे जातवैधता प्रमाणपत्र समितीच्या काही भ्रष्ट अधिकाऱ्यासोबत संगनमत करून या जातींची मंडळी अवैधरित्या जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेत आहे. राजपूत भामटा या जातीच्या नावातील साम्याचा फायदा ही मंडळी राजरोसपणे घेत आहे. त्यामुळे ज्यांचा सामाजिक व शैक्षणिक दर्जा उंचवावा या हेतूने हे आरक्षण ज्या विमुक्त जातींसाठी देण्यात आले त्याच जाती या आरक्षणापासून वंचित आहे. महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य व विधानसभेच्या सदस्यांनी विधिमंडळ सभागृहात ही समस्या मांडून शासनाच्या लक्षात पण आणून दिली.औरंगाबादसारख्या अनेक शहरात स्त्री पुरुषांचे लाखांचे मोर्चेही मूळ विमुक्त जातीकडून काढण्यात आले आहे. मुख्यमंत्री यांच्या दालनात या विषयावर सभाही झाल्या आहे. या सर्वांची दखल घेत शासनाचे बहुजन मंत्री अतुलजी सावे यांनी मुबई येथे झालेल्या पावसाळी अधिवेशनात शासन SIT ची स्थापना करीत असल्याची घोषणा केली होती. परंतु तिसऱ्याच दिवशी बहुजनमंत्री अतुलजी सावे यांनी, मी चुकीने SIT स्थापन करीत असल्याची घोषणा विधान परिषदेत केले असून, SIT चौकशी रद्द केली आहे. त्यामुळेच समाजात असंतोष पसरलेला आहे. शासनाने वेळीच दखल घेऊन आमच्या मागणीची पूर्तता करावी अन्यथा आता आरपारची लढाई लढण्यास समाज सज्ज होईल असा इशाराही मनोहर राठोड यांनी दिला आहे. अधिवेशना दम्यान हे आंदोलन उग्र स्वरूप धारण करेल असे मत सामाजिक कार्यकर्ते डि डी नाईक यांनी व्यक्त केले.

## गुणरत्न सदावर्तेंच्या सभेत राडा

**विदर्भ कल्याण / यवतमाळ**



एसटी को-ऑपरेटिव्ह बँकेची सर्वसाधारण सभा आज यवतमाळमध्ये पार पडली. या सभेत तुफान राडा झाल्याचं समोर आलं आहे. एसटी को-ऑपरेटिव्ह बँकेच्या अहवालावर नथुराम गोडसेचा फोटो छापल्याप्रकरणी हा राडा झाला. "शरद पवारांचे बगलबच्चे तांदळा एवढ्या खड्याइतके होते. गोंधळ वगैरे काही करू शकले नाहीत. तोंडातून शब्दही बाहेर पडले नाहीत. अत्यंत घाणेरडी कृती आहे. संदीप शिंदेंना (महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेचे अध्यक्ष) धडा शिकवण्याची गरज आहे. ज्या अहवालावर प्रभू राम चंद्रांचा फोटो, हिंदू राष्ट्रभारत लिहिलेला आहे, त्या अहवालावर हात लावण्याचा प्रयत्न केला आणि तिथून झोडपून बाहेर काढलेलं आहे असे गुणरत्न सदावर्ते म्हणाले.

एसटी को-ऑपरेटिव्ह बँकेची आज सर्वसाधारण सभा होती. एसटी को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडच्या यंदाच्या अहवालावर नथुराम गोडसेचा फोटो छापला आहे. यामुळे एसटी कर्मचाऱ्यांमध्ये राडा झाला. गुणरत्न यांनी याआधीही नथुराम गोडसेचा फोटो आपल्या बैठकांमध्ये वापरला होता. त्यामुळे आजच्या सभेत महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेने निषेध नोंदवत राडा केला."नथुराम गोडसेचं उदात्तीकरण महाराष्ट्रात किंबहुना देशात खपवून घेतलं जाणार नाही. नथुराम गोडसेचा फोटो छापल्यामुळे एसटी स्टेट ट्रान्सपोर्ट संघटनेचे कार्यकर्ते आक्रमक झाले आणि त्यामुळे आजच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला गुणरत्न सदावर्ते यांना येता देखील आलं नाही. आजच्या सभेवेळी त्यांच्या खुर्च्या देखील रिकाम्या होत्या", अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी दिली आहे. आजच्या घडीला एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वाची असणारी बँक सदावर्ते यांच्यामुळे अडचणीत आली आहे.बँकेच्या कर्मचाऱ्यांना संप सुरू केला आहे. एखादा कर्मचारी आजारी असेल तरी कुठल्याही प्रकारची त्याला वैद्यकीय मदत मिळण्याइतपत देखील पैसे मिळत नाहीत. एक प्रकारे बँक अडचणीत आणण्यामध्ये सदावर्ते यांचा मोठा हात आहे असा आरोपही शिंदे यांनी केला.

## आदिवासी आरक्षणात घुसखोरी नको



**विदर्भ कल्याण / पुसद**

आदिवासी समाजावर होत असलेल्या अन्याय विरुद्ध तसेच आदिवासी समाजाच्या अशिक्षितपणाचा फायदा घेत सदन समाज घटक आदिवासींच्या आरक्षणामध्ये घुसखोरी करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याविरुध्द जाहीर निषेध करण्यासाठी आणि सरकारला इशारा देण्यासाठी उप विभागीय अधिकारी पुसद मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद जिल्हाध्यक्ष अँड सुनिल ढाले, रामकृष्ण चौधरी, नारायण कऱ्हाले, गजानन टारफे, शीतल ढगे, गणपत गव्हाले, देविदास डाखोरे, किसन भुरके, संतोष गारुळे, अँड बालाजी उघडे, अँड किसन कोटुळे, अरविंद शेळके, तातेराव भडगे, नंदकिशोर आमले, शंकर इंगळे, दत्ता बोलके, अनिल इंगळे, संदीप आढाव, श्रीकांत मारकड, अविनाश शिकारे, केशव कुरकुटे, गणेश भुजाडे, ओमकार ढाकरे, श्रीकांत साबळे, करण वानोळे, अनिकेत ढगे, ऋषिकेश सुरोशे, चेतन असोले, अतुल बोंबले, कृष्णा आसोले, खुशाल बरगे, सत्यम धनवे, शुभम वाघमारे, पवन बहिरमकर, राजु गायकवाड, कुलदीप साबळे यांच्यासह शेकडो बांधव उपस्थित होते.

## ISRO चंद्रयान-3 ची प्रतीकृती उभारली

**विदर्भ कल्याण / पुसद**

तालुक्यातील खडकदरी येथील शेतकरी पुत्र, मुर्तीकार, दिव्यांग (अपंग) युवक "जगदीश रामा भालेराव" यांनी गणेशोत्सवाच्या निमित्ताने गणरायाची ISRO शास्त्रज्ञाचे रुपात 7 फुट मुर्ती स्थापन केली. स्वखर्चाने "चन्द्रयान-3"ची 35 फुट उंचीची भव्य प्रतीकृती उभारला.






हे देखावा पाहण्यासाठी पंचक्रोशीत लोक येत आहेत. "जय किसान - जय विज्ञान" चे मुर्तीमंत उदाहरण म्हणजे जगदीश भालेराव . विशेष म्हणजे मागील वर्षीचे गणेशोत्सवात भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी भारताचे स्वातंत्र्याला 75 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त "आझादी का महोत्सव" साजरा करण्याचे सर्व भारतीयांना आवाहन केले होते. तेंव्हा जगदीश भालेराव यांनी दिल्लीच्या "इंडीया गेट" ची 40 फुटाचा भव्य देखावा उभा केला होता.

## गणेश विसर्जन करतांना युवकाचा मृत्यू

**विदर्भ कल्याण / दारव्हा**

तालुक्यात गणवती विसर्जनाला सुरुवात झाली आहे. दहा दिवस सेवा केल्यानंतर भाविकांनी बाप्पाला निरोप देण्यात सुरुवात केली. बोरी अरब येथेही गणेश विसर्जन करण्यासाठी गेलेल्या युवकाचा अडाण नदीत पाय घसरुन पडल्याने पाण्यात बुडून मृत्यू झाला. ही घटना आज २८ सप्टेंबर रोजी बोरी अरब येथे घडली.



हितेश विलासराव पंचबुद्धे वय २२ असे मृतक युवकाचे नाव आहे.२८ सप्टेंबर रोजी गणेश चतुर्दशीला मुर्तीचे विसर्जन करण्यासाठी अडाण नदीवर गेला होता. यावेळी हितेश पंचबुद्धे याचा पाय घसरुन नदीत पडला. यावेळी तेथील नागरिकांनी त्याला पाण्यातून बाहेर काढून उपचाराकरीता उपजिल्हा रुग्णालय दारव्हा येथे दाखल केले. त्यानंतर यवतमाळला हलविण्यात आले. मात्र त्याचे प्राण वाचविण्यात अपयश आले. हितेशला आई-वडील नसल्यामुळे तो बोरी येथे काकांकडे शिक्षणासाठी होता. सदर घटनेने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## वडगाव येथे रफटा उखडला : बीडीओंना निवेदन

**विदर्भ कल्याण / दिग्रस**

तालुक्यातील वडगाव येथील तिवरी-आरंभी रोडला लागून असलेल्या गावांमध्ये जाणाऱ्या रोडवरील रफटा हा पूर्णपणे उखडला. गावातील नागरिकांना रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. सदर रफटा हा पूर्णपणे उखडला असल्यामुळे त्या ठिकाणी खड्ड्याचे स्वरूप आले आहे. गावक-यांना या रस्ताने जावे लागत असल्याने त्रास सहन करावा लागत आहे. तसेच अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर रफट्याचे काम करण्यात यावे अशी मागणी नागरिकांनी केली आहे. या बाबतचे निवेदनही वडगाव येथील नागरिकांनी दिग्रस गटविकास अधिकारी यांना दिले. या निवेदनावर ग्रामपंचायत सदस्य प्रेमसिंग राठोड, पोलीस पाटील विठ्ठल राठोड, उल्हास राठोड, हिंमत राठोड, भावराव राठोड यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## बाल गणेश मंडळांच्या वतीने वाचनालयाची स्थापना

**विदर्भ कल्याण / वणी**



आदिवासी बहुल तालुक्यातील सिंधी वाढोना येथील बाळ गणेश मंडळाच्या वतीने दरवर्षी बाप्पाचे दर्शन सर्व ग्रामस्थांना घडते. परंतु यावर्षी बाळ गणेश मंडळाच्या वतीने वाजा गाजा याला चक्क बगल देऊन या बालगोपाल यांनी सिंधी वाढोणा गावामध्ये शैक्षणिक विद्यार्थ्यांचे दृष्टीकोनातून लायब्ररीची (वाचनालय) स्थापना केली.

उद्घाटन प्रसंगी प्रशासकीय सेवेमध्ये निवड झालेल्या गणेश निवड (BSF), शारदा थेरे (सरस्वती महाविद्यालय नागपूर), करिष्मा निखाडे (कम्प्युटर ऑपरेटर नागपूर हायकोर्ट), कल्याणी निखाडे ( महाराष्ट्र पोलीस चंद्रपूर), शुभम उईक (महाराष्ट्र पोलीस मुंबई), करिष्मा सरवर (MSF मुंबई), विशाल राऊत (MSF मुंबई), रोशन जुणगरी (इंडियन आर्मी), नयन केळझळकर (कोतवाल सिंधी वाढोणा) यांच्यासह धृप निखाडे मूर्तिकार यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी मुकुटबन पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुरेश मस्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष विनोद निखाडे सरपंच सिंधी वाढोना हे होते. प्रमुख पाहुणे वाटेकर, चांदेकर (मुख्याध्यापक), राजेंद्र आसूटकर, सतीश जुनगरी, गणेश आवारी, ज्ञानेश्वर गानफाडे, मंगेश मोहितकर, अतुल निखडे, दिनेश मोहितकर, राजू आस्वले, नागेश घुगुल, चंद्रकांत उईके, दत्ता डोहे, कैलास निखाडे, गजानन निखिडे, ग्रामस्थ, विद्यार्थी उपस्थित होते.

## मारेगावचे विद्यार्थी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र

**विदर्भ कल्याण / मारेगाव**

पंचशील विद्यालय नवरगाव येथे पार पडलेल्या तालुका स्तरीय आंतर शालेय क्रीडा स्पर्धेत 19 वर्षाखालील खेळामध्ये मध्ये कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मारेगाव च्या विद्यार्थ्यांनी अतुलनीय कामगिरी केली आहे. वैयक्तिक क्रीडा प्रकारात भाला फेक, गोळा फेक, उंच उडी, लांब उडी, 1500 मीटर धावणे या क्रीडा प्रकारात महाविद्यालयातील मुल व मुली सहभागी होऊन तालुका स्तरीय स्पर्धेमध्ये यश संपादन केले. त्यांची निवड जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी झाली आहे.




सांघिक या क्रिडा प्रकारात व्हॉलीबॉल, कब्बडी स्पर्धेमध्ये मुले जिल्हा स्तरीय स्पर्धेसाठी पात्र झाले आहे.

विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय प्राचार्य हेमंत चौधरी, प्रा. चिंचोलकर, प्रा. हेलगे, सर्व प्राध्यापकाना व आई वडिलांना दिले आहे. या यशाबदल संस्थेचे अध्यक्ष जिवन पाटील कापसे, प्राचार्य हेमंत चौधरी यांनी कौतुक केले.

## रेबीज दिनानिमित्त लसीकरण



**विदर्भ कल्याण / दारव्हा**

पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी 1 लोही येथे दिनांक 28 सप्टेंबर रोजी जागतिक रेबीज दिनानिमित्त अँटी रेबीज लसीकरण शिबिर घेण्यात आले. यावेळी पशुपालकांना कुत्र्यांपासून होणारे रोग व कुत्र्यांची काळजी कशी घ्यावी व त्यासाठी प्रतिबंधक उपाय म्हणून काय करावे याविषयीचे मार्गदर्शन पशुधन विकास अधिकारी डॉ. मनीषा डोनेकर यांनी केले. यावेळी दवाखान्याचे कर्मचारी कु. स्मिता मेश्राम, पशुपालक अमोल मोकळकर, अनिकेत मलमकार, गिरीश राऊत, अनुराग चावके, विशाल जयस्वाल व इतरही पशुपालकानी सहभाग नोंदविला.

### रामनगर वार्डातील रस्त्याची दुरावस्था : ग्रामपंचायतला निवेदन

## मुकूटबन येथील नागरिक काढतात चिखलातून मार्ग

**विदर्भ कल्याण / झरी**





तालुक्यातील मुकूटबन गावातील रामनगर वार्डातील रस्त्याची दुरावस्था झाली आहे. नागरिकांना रस्त्यावरुन चालणेही कठीण झाले असून, चिखलातून मार्ग काढावा लागत आहे. त्यामुळे संतप्त नागरिकांनी ग्रामपंचायत कार्यालय गाठून निवेदन दिले असून, रस्ता दुरूस्तीची मागणी केली आहे.

मुकूटबन ग्रामपंचायत गावातील समस्या निकाली काढण्यात अपयशी ठरलेली आहे. गावातील समस्या निकाली काढने आवश्यक असतांना अडीच वर्षे संपूनही समस्या जैसे थे आहे. विनाकारण नागरीकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे. वीज पाणी रस्ते सुविधा नागरीकांच्या मूलभूत गरजा लक्षात घेऊन काम करण्याची गरज आहे. रस्त्याची समस्या घेऊन नागरिक ग्रामपंचायत कार्यालयात अर्ज सादर केला आहे. राम नगर वार्डातील तुकडोजी भवन कडील रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. हा रस्ता सरळ तुकडोजी भवन मार्गे बेघर वस्ती कडे जोडला गेला आहे. परंतु पावसात खड्डेमय रस्त्याच्या दुरावस्थेमुळे ये जा करणे कठीण झाले आहे. दरवर्षी प्रमाणे तुकडोजी भवन मध्ये भजन स्पर्धा कार्यक्रम होणार आहे. शेकडो गावातील व परगावातील लोकांची रेलचेल असते. यवतमाळ चंद्रपूर जिल्ह्यातील भजनी मंडळ आवर्जून स्पर्धेत हजेरी लावतात. त्या आधी रस्ता दुरुस्ती होने आवश्यक आहे. परंतु याबाबत ग्रामपंचायत प्रशासनाला जाग कधी येणार हा मोठा प्रश्न आहे. चिखलमय रस्ता दुरुस्ती करा या बाबतीत वार्डातील नागरिकांनी ग्रामपंचायत कार्यालय गाठून अर्जाद्वारे रस्ता दुरुस्ती साठी मागणी केली आहे.

## मार्डी ते गाडेगाव रस्ता खड्ड्यात

**विदर्भ कल्याण / मारेगाव**

मार्डी ते गाडेगाव रस्त्यावर खड्डेच खड्डे पडले आहे. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून, मानव विकास मिशनची शाळकरी विद्यार्थ्यांसाठी असलेली बस सुद्धा बंद झालेली आहे. त्यामुळे या रस्त्याकडे संबंधीत विभागाने लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

मार्डी ते गाडेगाव हा अंदाजे 6 ते 7 किमीचा रस्ता. यात मजरा ते गाडेगाव हा रस्ता वाहतुकीसाठी धोकादायक बनलेला आहे. या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडलेले आहे. एके ठिकाणी तर पाईपालाच मोठे छिद्र पडलेले आहे. सध्या पावसाळा सुरु असून अनेक ठिकाणी पावसाचे पाणी साचलेले आहे. या खड्यामध्येही पाणी साचत आहे.

खड्यामध्ये साचलेले पाणी अनेकदा लक्षात येत नसल्याने काही जण या खड्यामध्ये पडल्याचीही उदाहरणे आहे. तसेच जागोजागी खड्डे पडले असून



यात पाणी साचून तळ्यासारखे स्वरूप आल्याचा भास होतो.

महाराष्ट्र शासनातर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी मानव विकास मिशन तर्फे बस आहे. परंतु रस्त्यावर खड्डे असल्याने या बसेस आता बंद आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे. या समस्येकडे शासनाचे दुर्लक्ष असून यात सामान्य नागरिकांसोबतच शाळकरी विद्यार्थी मात्र होळपळले जात आहे.

दैनिक
# विदर्भ कल्याण
## यवतमाळ जिल्हा विशेष
शुक्रवार,
२९ सप्टेंबर २०२३

दैनिक विदर्भ कल्याण
घटना, घडामोडी, विश्लेषण, सदैव अपडेट राहण्यासाठी
जनतेच्या मनातील एकमेव आवाज
वाचत रहा
विदर्भ कल्याण.....
बातम्या, जाहीरात, व अंकासाठी संपर्क
भोजराज नागपुरे संपादक मो. ९४२२८२५५९७
राहुल वासनिक जिल्हा प्रतिनिधी, यवतमाळ
मो. ९८९०८७५२६१, ९४०४४८६३६१

### रुग्णाच्या जीवाशी खेळ : पोलीस ठाण्यात तक्रार
## आरोग्य सेवकाकडून चुकीचे उपचार : महिलेची प्रकृती गंभीर

**विदर्भ कल्याण / झरी**

तालुक्यातील मुकुटबन येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या एका आरोग्य सेवकाने चुकीचां उपचार केल्याने महिलेची प्रकृती गंभीर झाली. या आरोग्य सेवकावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी महिलेच्या भावाने पोलीस स्टेशनला तक्रार देऊन केली आहे.

२२ सप्टेंबर २०२३ रोजी पिंपरड येथील हर्षाली हरीश बघेले या महिलेची प्रकृती बिघडली. या बाबतची माहिती गावातीलच एका महिलेला कळताच तिने प्राथमिक रुग्णालयातील आरोग्य सेवक व्यंकटेश मेटपेल्लीवार याला माहिती दिली. स्वतःला डॉक्टर म्हणून वावरणाऱ्या आरोग्य सेवकाने सायंकाळी ६ वाजता रुग्णाची तपासणी केली. रुग्णाला सलाईन व इंजेक्शन द्यावे लागनार असे सांगितले. त्यानंतर रुग्ण महिलेला सलाईन व इंजेक्शन दिले. त्यानंतर काही मिनिटातच रुग्णांची प्रकृती जास्त बिघडली. त्यामुळे हर्षाली हिला येथील ग्रामीण रुग्णालयात आणले. श्वास घेण्यास त्रास होत असल्याने पुढील उपचारासाठी एका खाजगी रुग्णालयात दाखल केले. परिस्थिती गंभीर असल्यामुळे सदर महिला रुग्णाला आयसीयू मध्ये नेले. रुग्णाच्या पती हरीश बघेले याने आरोग्य सेवकाला फोन करून बोलण्याचा प्रयत्न केला परंतु कोणतेही कॉल रिसिव्ह केले नाही. रुग्णाच्या घरची स्वतःची परिस्थिती ही नाजूक असल्याने खाजगी दवाखान्याची फी कुठून भरावे हा प्रश्न निर्माण झाला आहे. डॉक्टर म्हणून तपासणी करणाऱ्या मेटपिलीवार याच्या चुकीच्या उपचारामुळे ही परिस्थिती निर्माण झाली असा आरोपही होत आहे.



वणी येथील खाजगी रुग्णालयातही प्रकृती खालावल्याने अखेर महिलेला नागपूर येथे हलविण्यात आले. चुकीचे इंजेक्शन व सलाईन दिल्याने रुग्णाच्या किडनी लिव्हर सह आतड्यावरही याचा इफेक्ट झाल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. मुकुटबन येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेला व्यंकटेश मेटपेलिवार हा खेडे गावात स्वतःला डॉक्टर म्हणून वावरत असून, उपचार करतो अशी माहिती आहे. कोणत्याही प्रकारची डिग्री नसताना जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी तक्रार रुग्णाचा भाऊ सुशील कुमार युवराज निंबोणे यांनी रुग्णाची परिस्थिती गंभीर असल्यामुळे त्यांना मुकुटबन पोलीस स्टेशन न गाठता वणी येथे ही तक्रार देण्यात आली.

**निलंबनाचा प्रस्ताव पाठविणार**

सदर व्यक्ती जवळ कोणत्याही प्रकारची डिग्री किंवा परवानगी नाही. मेटपेल्लीवार यांनी केलेले उपचार कायद्याने चुकीचे आहे. त्यांच्या कायदेशीर कार्यवाही करून निलंबित करण्याचा प्रस्ताव पाठवणार अशी प्रतिक्रीया झरीचे तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहन गेडाम यांनी दिली.

**कायदेशीर कार्यवाही करणार**

रुग्णाच्या तपासणी करिता पाठवले नाही. स्वतः आपल्या मर्जीने किंवा व्यक्तीच्या जाऊन हे उपचार केले आहे. त्याला आम्ही जबाबदार नाही. याबाबतची माहिती मी वरिष्ठांना सुद्धा दिली आहे. त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल अशी प्रतिक्रीया डॉक्टर वानखेडे, आरोग्य अधिकारी ग्रामीण रुग्णालय मुकुटबन यांनी दिली.

**तक्रार मुकुटबन पोलीस ठाण्यात पाठवणार**

वणी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार प्राप्त झाली आहे. सदर घटना मुकुटबन पोलीस स्टेशन हद्दीत येत असल्यामुळे सदर तक्रार मुकुटबन पोलीस स्टेशनला फॉरवर्ड करणार असल्याची माहिती ठाणेदार अजित जाधव यांनी दिली आहे.

## नागपूर कराराची होळी




**विदर्भ कल्याण / यवतमाळ**

वेगळा विदर्भ झालाच पाहीजे, अशा घोषणा देत नागपूर कराराची होळी करण्यात आली. विदर्भ राज्य आंदोलन समिती यवतमाळ चे वतीने अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विदर्भ वेगळा झालाच पाहीजे अशा विदर्भ वाद्यांनी शासनाचा धिक्कार करीत नागपुर कराराची होळी केली.

विदर्भ राज्य आंदोलन समिती यवतमाळ जिल्हाध्यक्ष कृष्णराव भोंगाडे, यांचे नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात जय विदर्भ पार्टीचे जिल्हाध्यक्ष अरुण जोग, कोअर कमेटीचे सदस्य प्रा. हेमंत मुदलीयार, गोविंदराव चव्हाण, शहर अध्यक्ष ॲड. अजय चमेडीया, मधुकरराव कोवे, दिलीपसिंह गौतम, चारुदत्त नेरकर, श्रीधर धवस,



दुर्वास भगत, निलेश तोडकरी, विजय निवल, संजय भोयर, गणेश चौधरी, प्रल्हाद काळे, अशोक कारमोरे, इंदरचंद बैद, राजु झोटींग, लकी लष्करी, अशोक वाकोडे (आर्णी) व अनेक जन उपस्थित होते.

## धनगरांना 50 वर्षात दिल नाही ते 50 दिवसात देतो म्हणते !
### आरक्षणाचा अखेरचा लढा : 2 ऑक्टोबर पासून यवतमाळ येथे उपोषण

**विदर्भ कल्याण / यवतमाळ**

धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची अंमलबजावणी व मेंढपाळांना कायमस्वरूपी चराई क्षेत्र उपलब्ध झाले पाहिजे यासाठी आझाद मैदान, यवतमाळ येथे 2 ऑक्टोबर 2023 सकाळी 11 वाजता पासून पवन थोटे यांच्या नेतृत्वात उपोषण करण्यात येणार आहे.

धनगर आरक्षणाची अंमलजावणी करा,मेंढपाळांना मेंढी चराई साठी कायमस्वरूपी चराई क्षेत्र उपलब्ध करून द्या, एक रुपयात मेंढपाळाचा व मेंढीचा विमा काढा, अहिल्यानगर नामांतरनाचा आदेश काढा, धनगरांच्या पवित्र भंडाऱ्याचा अपमान करणाऱ्या मंत्र्याला मंत्रिमंडळातून काढून टाका आदी मागण्यासाठी यवतमाळ येथे उपोषण करण्यात येणार आहे.19 डिसेंबर 2022 रोजी नागपूर हिवाळी अधिवेशनावर यवतमाळ ते नागपूर पवन थोटे यांच्या नेतृत्वात पदयात्रा काढण्यात आली होती. 19 डिसेंबरला भव्य मोर्चा काढण्यात आला होता या मोर्चाला उपमुख्यमंत्री यांनी एक महिन्यात मेंढपाळांच्या मागण्या निकाली काढतो म्हणून आश्वासन दिले होते. आता एक वर्ष होत आले तरी काहीच हालचाल केली नाही. निव्वळ घोषणाच सरकार झालं, 2014 मध्ये विद्यमान उपमुख्यमंत्री यांनी पहिल्या कॅबिनेट मध्ये आरक्षण देतो म्हणून घोषणा केली. परंतु त्यांनी केलेली घोषणा ते विसरले,आता नवीन घोषणा करत आहे, पन्नास दिवसात धनगर आरक्षणाचा प्रश्न सोडवू परंतु यासोबतच ते हे करायला विसरले नाही कि आदिवासी समाजाला विरोध करायला सुरवात करा म्हणून, परंतु आता कितीही आदिवासी बांधवानी विरोध केला तरी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी धनगरांना आरक्षणाची नोंद घटनेत करून ठेवली नाही ही नोंद तुम्ही आम्ही केली नाही मग आरक्षण नाकारण्याचा किंवा विरोध करण्याचा प्रश्नच नाही, आरक्षण नाही तर भाजपाला धनगर समाज येणाऱ्या निवडणुकीत मतदान करणार नाही हे लक्षात असू द्या.2 ऑक्टोबर रोजी होणाऱ्या उपोषणास संपूर्ण महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात समाज बांधव भगिनी उपस्थित राहणार आहे. या उपोषणास ना पक्ष ना नेता म्हणजे कोणत्याही राजकीय नेत्याचा सहकार्य नसून सामान्य माणसातून उभ राहिलेलं आंदोलन आहे. जो पर्यंत आरक्षण नाही तो पर्यंत हे उपोषण सुरु राहणार आहे हे विशेष. या आंदोलनासाठी डॉ.संदीप धवने, पांडुरंग खांदवे, श्रीधर मोहोड, राजेश गायनर, बाळासाहेब शिंदे, संजय शिंदे, डॉ. रमेश महानूर, डॉ.राजीव मुंदाने, प्रकाश नवरंगे, गोविंद तासके, वसंत ढोके, प्रकाश जानकर, राजेश मदने, अविनाश जानकर, सुरेश भावेकर, विलास शेरकी, संजय काळे, निळकंठ येरेकर, लक्ष्मीप्रसाद वाघमोडे, प्रमोद मेटांगे, नितीन गोरले, डॉ. भीमराव कोकरे, विजय धानोरकर, प्रशांत मासाळ, सदाशिव नरोटे, रवी मुंदाने, मुकेश चुडे, दिलीप बांबल, यादव गावंडे, अनिल गावंडे, उमेश अवघड, किशोर ढोरे, दीनानाथ बाबरे, सुरेश मात्रे, सुरेश गोफने, सुभाष बोडखे, सदबाराव मोहोटे, बाळासाहेब चंद्रे, अमोल चिकणे, सचिन घोरपडे, सचिन खटके, विनोद शिंदे, निखिल मस्के, कृष्णा पावडे, हनुमंत फुलसे, दादाराव महानर, अशोक वगरे, बाबाराव महानर, विजय महानर, विलास महानर, रेणू शिंदे, संगीता गायनर, शोभा पुनसे, माला पुनसे, कल्पना मोहोड, वैशाली मासाळ, प्रमोदींनी मुंदाने, लता गलाट, वर्षा पडवे सहकार्य करीत आहे.

## 'डिजिटायलायझेशन ऑफ बँकिंग' या विषयी कार्यशाळा



**विदर्भ कल्याण / झरी**

राजीव विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, झरी येथे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा मुकुटबनच्या वतीने दि. २६ सप्टेंबर ला 'डिजिटायलायझेशन ऑफ बँकिंग' ह्या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल. एन. कोरपेनवार हे होते. कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून अजय ठाकरे आर. बी. ओ. स्टेट बँक ऑफ इंडिया यवतमाळ व किरण जांभुळे, सर्विस मॅनेजर, एस. बी. आय मुकुटबन वंशिका उपस्थिती होते. अजय ठाकरे यांनी बँकेच्या डिजी टायलायझेशन बँकेत होणाऱ्या ऑनलाईन फसवणूक कशी होते. ते रोखण्यासाठी काय प्रतिबंध करता येईल याविषयी सखोल मार्गदर्शन केले. आजच्या डिजी टायलायझेशनच्या युगात मोबाईल बँकिंगचा वापर कशा पद्धतीने केला पाहिजे ह्या विषयी योग्य असे मार्गदर्शन केले. भविष्यात बँकिंग क्षेत्रातील संधी व बँकेच्या सहाय्याने उद्योग कसा करता येईल व अर्थसाहाय्य कशा पद्धतीने मिळवता येतो ह्या विषयी सुद्धा अमूल्य असे मार्गदर्शन केले. किरण जांभुळे यांनी सुद्धा बँकिंग क्षेत्रात होणाऱ्या उद्योग करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कशा पद्धतीने उद्योग सुरू करावा व बँकेच्या मदतीने अर्थसहाय्य कसा मिळवावा ह्या विषयी सखोल मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. अनिल. एन. कोरपेनवार ह्यांनी बँकेच्या डिजीटायलायझेशन विषयी त्यांना असणारा अनुभव विद्यार्थांनं समोर व्यक्त केला व भविष्यातील उद्योजक विद्यार्थांनसाठी उद्योग सुरु करण्यासाठी प्रेरित केले. बँकेने अर्थसाहाय्यया करिता मदत करावी अशी अपेक्षा व्यक्त केली. ह्या कार्यशाळेचे आयोजन प्रेमकुमार नरडलवार यांनी केले. तर संचालन वाणिज्य विभागाचे विभाग प्रमुख डॉ. आस्तीक एस. रंगनेनीवार यांनी केले. तर आभार नॅक समन्वयक सहा. प्रा. संतोष. पोलचेट्टीवार यांनी मानले. यावेळी सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी ह्यांची उपस्थिती होती.

## जिजामाताद्वारा कलश यात्रेचे आयोजन



**विदर्भ कल्याण / दारव्हा**

नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ दारव्हा द्वारा संचालित जिजामाता कला महाविद्यालय येथील विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने स्वतंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त मेरी मिट्टी मेरा देश या अभियानांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कलश यात्रा काढली माझी माती माझा देश अशा घोषणा देत शहरातून भव्य कलश यात्रा काढली. कलशात प्राचार्य प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी मूठभर माती कलश मध्ये टाकून तो कलश विद्यापीठामुळे सादर करायचा आहे. या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. ए.पी. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी कल्याण प्रभारी डॉ. पुरुषोत्तम बांडे आयक्युएसी समन्वयक डॉ रामधन हिरे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ रमेश खंडारे, डॉ. प्रीती ठाकरे, डॉ. जयवंत जुकरे, डॉ. राजेश गेडाम, नितेश कदम, सचिन माटोळे, सतीश सरतापे, विनोद कंठाळे, सोमराज लोहकरे, प्राची राऊत, विशाखा कोल्हे ,महेश चांदोडे, शुभम नांदेडकर, मिथुन राठोड, नरेश वानखडे, कृष्णा राठोड, सुनील कोते, ऋतिक सहारे, प्रथमेश आडे, रविना जाधव, राणी जाधव, माधुरी राठोड , जयश्री पवार, भूमिका चव्हाण, दिपाली रुडे, रवीना ससाने, पल्लवी पारधी, दामिनी जाधव, सपना राठोड, पल्लवी जाधव, स्मृती मस्के, दौलत शिंदे, हर्षा राठोड, स्नेहल डांगरा, अक्षया जयसिंगपूर आदींनी परिश्रम घेतले.

## निरोगी मानसिक आरोग्य

**विदर्भ कल्याण / यवतमाळ**

अजय ला अभ्यासावर लक्ष केंद्रित करायला अवघड जात होते. शांत बसता येत नाही. सारखे निकाला नंतर काय होईल, पुढचे कसे होईल, हेच विचार फिरत राहायचे. राजलक्ष्मी चा नवरा अपघातात ३ महिन्यांपूर्वी गेला होता, तीला व त्यांच्या २ मुलांना मागे सोडून. ती घरची कामे व गरजेची कामे करत होती. टिकेला कुठे जागा नव्हती. पण ती हसायची नाही एकटी राहायची, सुन्न होऊन शून्यात पाहत राहायची. राणीला इतर लोक किती ही म्हणले तरी वाटते कि तिने अजून सुंदर दिसायला हवे. वेगवेगळे डाएट्स ने आता ती बारीक झाली आहे पण अशक्त पण झालीये. सतत चिड-चिड होते. वाईट वाटले किंवा टेन्शन आले कि मग ती खूप खाते.मग बारीक होण्यासाठी परत नवीन डाएट. राम गेले 4 महिन्यांपासून ऑफिस मध्ये जास्त थांबायला लागलाय. त्याच्यावर कामाची जबाबदारी खूप वाढली आहे. अचानक खूप वजन कमी झाले आहे. नेमही आपल्या मित्र व नातेवाईकांमध्ये रमणारा राम त्याला त्यांना एक मेसेज करायला सुद्धा वेळ होत नाही आहे. त्याची घरा मध्ये चिड-चिड पण वाढलीये.पैसा मिळतो आहे पण आराम, विश्रांती चे थोडे हि नाव नाही. हे सर्व मानसिक आरोग्य व तणाव ह्याच्याशी निगडीत आहे, हे आपल्याला लक्षात येत असेल , पण आपण अश्या परिस्थिती मधून जाणाऱ्यांना काय सल्ले द तो? किंवा त्यांना काय आधार देतो? "आशेवर लक्ष केंद्रित करा", "चांगल्या गोष्टी पाहा", "वाईट विचारांकडे दुर्लक्ष करा","आपल्या पेक्षा कठीण परिस्थीती आहे त्यांच्याकडे पाहा". हे क्वचितच उपयोगी असते.अश्या सल्ल्यांमुळे ज्यांनाअधिक त्रास होत असतो,ते आपला त्रास मनातच ठेवतात, त्यांना स्वतःचा राग येतो, आपली चूक आहे का असा वाटू शकत व आपल्याला समजून घेणार कुणीच नाही असे वाटून त्यांचा त्रास वाढू शकतो. जरा सोप्प्या पद्धतीने सुरुवात करूयात. मानसिक आरोग्य म्हणल्यावर काय काय येत आपल्या मनात? मानसिक आजार,डिप्रेशन, नसलेले व्यक्ती दिसणे,नसलेले आवाज येणे,स्वतःला संपवण्याचे विचार? हा मानसिक आरोग्याचा भाग नक्की आहेच, पण मानसिक आरोग्यामध्ये आजारांशिवाय देखील बरेच काही असते. तीव्र भीती, सतत चिंता,न दिसणारे दबाव,विश्वासाचा अभाव,अनियंत्रित राग हे असे रोजचे सामान्य असणारे घटक वाटतात, पण आपल्या मानसिक आरोग्यावर जबरदस्त प्रभाव पाडतात. हे त्रास वेळेत हाताळले गेले नाहीत तर वाढत वाढत मानसिक आजारांचे रूप घेतात. आपल्या मनासाठी व मानसिक आरोग्यासाठी आपण काय करतो? आपल्या शरीराची आपण काळजी घेतच असतो.काय होतंय हे पाहत असतो. जखम झाली तर मलम पट्टी करतो. खोल घाव असेल तर आपण दवाखाना गाठतो. जास्त हानी होऊ नये ह्यासाठी काळजी घेतो. पण मनाला त्रास कधी होतोय, कसा होतोय, घाव किती खोल आहे, हे पाहायला क्वचितच थांबतो. तसच मन घेऊन परिस्थितीशी लढत असतो, सामना करत असतो, जीवन तसेच जगत असतो. भावना, विचार, परिस्थिती, नैतिकता ह्यांचा मेळ घालत कधी मनाला समजावतो, शांत करतो किंवा बहुतेक वेळी दुर्लक्षच करतो. कुणाकडे व्यक्त करायला गेलो तर सल्ला किंवा टीका मिळणार, त्यांना आपल्या बद्दल काय वाटेल ह्याची भीती वाटून व्यक्त करत नाही- साठवत राहतो. जसे शरीरासाठी करतो, तसे मनासाठी का नाही? काही जणांना माहित नसतं, तर काही जणांना हा विचार एकदा हि मनात आलेला नसतो. आदर्श जीवन आणि जबाबदाऱ्यांच्या संघर्षात आपण अनेकदा वयक्तिक गरजांकडे लक्ष देण्यास विसरतो. मनाची काळजी कशी घ्यावी, मनाला त्रास होतो तेव्हा काय करावे, कधी स्वतःची काळजी स्वतः कधी घ्यावी आणि कधी मदत घ्यावी ह्याबद्दल सगळ्यांना प्रश्न पडतात. मदत घ्यायची तरी कुणाकडे जावे हे कळत नसते.यासाठी अश्या सेवेची गरज आहे. जी समस्या समजून, गरज ओळखून त्याप्रमाणे मार्गदर्शन करतील. मनातले ताण मोकळे करणे हे फक्त मनासाठीच नाही, तर शरीरासाठी पण महत्वाचे आहे. MCF ने मार्च २०२३ पासून ह्याच कारणासाठी मुक्ता मेंटल हेल्थ हेल्पलाईन सुरु केली आहे. आमची मोफत हेल्पलाईन मानसिक किंवा भावनिक त्रासातून जात असलेल्या व्यक्तींसाठी सुरक्षित, गोपनीय, आणि पूर्वग्रहरहित समुपदेशन केले जाते. ह्या हेल्पलाईन कॉल केल्यानंतर तुम्ही आमच्या प्रशिक्षित समुपदेशकाशी बोलू शकाल. इथे आपल्याला ऐकण्यासाठी एक सहाय्यक, आश्वासक जागा मिळेल जिथे मन मोकळ करू शकाल. तुमचा त्रास, गरजा, समस्या समजून एकत्रितपणे कसे हाताळावे हे ठरवू शकाल. मानसिक आरोग्याभोवतीचा कलंक कमी करू या. या संदर्भातल्या चर्चा सुरु करूयात.

**मुक्ता मेंटल हेल्थ हेल्पलाईन**
**दुपारी १२ ते सायंकाळी ८ .**
**हिंदी, मराठी, इंग्रजी मध्ये**
**मोबाई क्र. ७८८७८८९८८२**

## जय हिंद चौकात प्रतापगडाच्या किल्ल्याची प्रतिकृती तयार करणार

**विदर्भ कल्याण / यवतमाळ**

धामणगाव मार्गा यावर्षी जय हिंद चौकात आई जगदंबेची स्थापना धुमधडाक्यात व उत्साहाने साजरे करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानिमित्त पहिली सभा २४ सप्टेंबर रोजी पवन अराठे यांच्या घरी पार पडली. यावर्षी प्रतापगडाच्या किल्ल्याची प्रतिकृती तयार करण्यात येत आहे. आई भवानी छत्रपती शिवाजी महाराजांना भवानी तलवार देतानाची मूर्ती तयार करण्यात येत आहे.



या सभेला बाळासाहेब चौधरी, वसंतराव अराठे, प्रेम जयस्वाल, दीपक ठाकूर यांच्या मार्गदर्शनात जय हिंद चौकाची 2023 ची नवीन कार्यकारणी घोषित झाली. यावर्षी जय हिंद चौकात नऊ दिवस अन्नदान करण्याचा संकल्प करण्यात आला. जगदंबा स्थापनेचे हे ५९ वर्ष आहे. अध्यक्ष रितेश निलावार, उपाध्यक्ष पवन नथवानी, पंकज भुतडा, सचिव प्रशांत गोडे, सहसचिव प्रशांत शेटे, कोषाध्यक्ष ललित जैन, सह कोषाध्यक्ष मुन्ना सिंघानिया, कार्यकारी सदस्य प्रमोद पतीगे, मनीष देशपांडे, बंटी कैपिल्लेवार, ॲड. वरून भुतडा, रवी ठाकूर यांचा कार्यकारणीत समावेश आहे. मार्गदर्शक बाळासाहेब चौधरी, वसंतराव आराठे, रामेश्वर यादव, टोनू ढोरे यांच्या मार्गदर्शनात अन्नदान समिती काम करणार आहे.

## बालसंगोपन योजनेच्या जनजागृतीची गरज : फिरोज अन्सारी

**विदर्भ कल्याण / फुलसावंगी**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन या योजने च्या केवळ माफक जनजागृती च्या अभावाने जिल्ह्यातील हजारो लाभार्थी अनाथ बालके वंचीत आहे. योजन ची माहिती तळागाळातील सामान्य कुटूंबा पर्यंत पोहचणे काळाची गजर झाली आहे. असे विचार मुव्हमेंट फॉर पीस अँड जस्टीस अँड वेलफेअर या संघटनेचे जिल्हा अध्यक्ष फिरोज अन्सारी यांनी केले.



फुलसावंगी येथे घेण्यात आलेल्या जनजागृती व मोफत अर्ज भरून घेण्याच्या मोहिमे अंतर्गत घेतलेल्या कॉर्नर सभेमध्ये ते बोलत होते. मुव्हमेंट फॉर पीस अँड जस्टीस अँड वेलफेअर ही संघटना सामाजिक कार्यात आपले मोठे योगदान देत आहे. रेशन योजना, विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, अल्पसंख्यांक मुला-मुलींच्या वसतिगृह आदींबाबत आंदोलन करून शासन दरबारी पाठपुरावा करते, वेळप्रसंगी न्यायालयीन लढा लढून न्याय देण्याचा संघटनेने प्रयत्न केला आहे. त्यात संघटनेला पूर्णपणे यशही मिळाले आहे. संघटनेने आता अनाथांच्या हक्कासाठी पुढाकार घेतला आहे. या अभियानाअंतर्गत फुलसावंगी येथील किनवट पॉईंट वर मोठी कॉर्नर सभा घेण्यात आली यावेळी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष यांनी उपस्थित नागरिकांना योजनेची सखोल माहिती दिली. शिवाय योजना तळागाळातील सर्व सामान्य व्यक्ती पर्यंत पोचवण्याचे आव्हान त्यांनी उपस्थित नागरिकांना केले. यावेळी संघटनेचे अन्सार हुसेनी, रफिका ताई पठाण,मोहसीन राज यांच्या चमूने येथे वेगवेगळ्या ठिकाणी जनजागृती कार्यक्रम घेतले.